# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B N S S -2023)

1. राज्य महाराष्ट्र State | जिल्हा मुंबई District | पोलीस ठाणे ला.प्र.वि. Police Station | पहिली खबर क्र. 36 FIR No | वर्ष 2025 Year | दिनांक 14/11/25 Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम 1988 कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day शुक्रवार तारीख पासून Date from 30/10/25 वेळ Time 17.00 तारीख पर्यंत Date to 31/11/25 वेळ Time 17.43

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 30/10/2025 वेळ Time 17.00

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 02/25 तारीख Date 14/11/2025 वेळ Time पहाटे 05.15

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी लेखी / तोंडी Written / Oral समक्ष

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O. P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणचे नाव Address of Occurrence Name विद्युत निरीक्षक यांचे कार्यालय एल. बी. एस मार्ग कुर्ला पश्चिम, मुंबई 400070. ठिकाणाचे नंबर No. if any ...... गल्ली Ward ...... रस्त्याचे नाव Name of road ......
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ...... गाव Village ...... पोस्ट Post ...... तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State महाराष्ट्र

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ...... तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name श्री गणपत रघुनाथ परचाके
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रघुनाथ परचाके
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 20/08/1981 (44 वर्षे)
(d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9049583950
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ...... दिल्याचा दिनांक Date of issue ...... दिल्याचे ठिकाण Place of Issue ......
(f) व्यवसाय Occupation नोकरी
(g) धर्म Religion हिंदू जात Caste ...... जनजात Sub-Caste ......
(h) पत्ता Address सी/6/15, गुरुदत्त सोसायटी, सेक्टर 48 ए, सिवुड्स, नवी मुंबई. गल्ली/सर्व्हे नं. Ward ...... घर/नांव नं. House Name No. ...... फोन/मो. नं. Phone No. ...... पॅन नं. Pan No. ...... वोटर्स नं. Card No. ......
रस्त्याचे नाव Road ...... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ...... गाव Village ...... पोस्ट Post ...... पो. स्टे. P. Stn. ......
तालुका Taluka ...... जिल्हा Dist. ...... राज्य State ...... सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

गजानन प्रल्हाद राठोड वय-40 वर्षे, पद - सहायक अभियंता (विद्युत) वर्ग-2 लिन्डिवा नं.10, ए विंग, रूम नंबर 408, निसर्ग को. ऑप. हौ. सोसायटी चांदिवली म्हाडा कॉलनी, अंधेरी (पूर्व) मुंबई-72



Scanned with OKEN Scanner

29

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकुण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page. यातील नमूद तारीख वेळी लोकसेवक गजानन राठोड यांनी तक्रारदार गुंजाळ यांच्या पत्नी रुपा गुंजाळ यांचे नावावरील श्री रेणुका एन्टरप्रायजेस या कंपनीस विद्युत कॉन्ट्रॅक्टर लायसन्स देण्याकरिता तक्रारदार गुंजाळ यांचेकडे पडताळणी कारवाई दरम्यान दिनांक 03/11/25 रोजी एक लाख वीस हजार व दि. 12/11/25 रोजी चार लाख रुपये लाचेची मागणी करुन स्वतःस फायदा प्राप्त करण्याचे हेतूने दि. 13/11/25 रोजी तक्रारदार गुंजाळ यांचेकडून टेकन तडजोडीत एक लाख रुपये लाच करण्याचे हेतूने दि. स्विकारण्याची तयारी दर्शविली त्याप्रमाणे दि 13/11/25 रोजी सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष एक लाख लाचेची रक्कम स्वीकारल्यानंतर रंगेहात ताब्यात घेण्यात आले म्हणून लोकसेवक गजानन राठोड यांचे विरुद्ध भ्र.प्र. अ. 1988 चे कलम 7 अन्वये

13. केलेली कार्यवाही -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या फिर्याद नोंद

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : सौ. सुषमा सुशांत रणोत पोलीस निरीक्षक.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .......... Rank .......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........

(3) Transferred to P. S. ..........
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name सुषमा सुशांत रणोत

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. लाप्रवि मुंबई विभाग.

Posting

Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 14/11/2025

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner

ફિર્યાદ

ફિર્યાદી યાંચા સ્વતંત્ર કાગદાવર ઘેણ્યાત આલેલી ફિર્યાદ હિચ યા ગુન્હ્યાચી પ્રથમ ખબરી અહવાલ સંબોધણ્યાત યાવી.

સમક્ષ

સુષમા એસ ખોત
પોનિ, આપ્રવિ મુંબઈ

गणपत पस्थाके
पो.नि. आप्रवि, मुंबई

फिर्याद दिनांक १३/११/२०२५

श्री. गणपत रघूनाथ परचाके वय ४४ वर्षे, धंदा : नोकरी (पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई) राठी : सी/६/१४, गुरुदत्त सोसायटी, सेक्टर ४८ अे, सिवुडस, नवी मुंबई मो.क्र. ९०४९५८३९५०, आधार कार्ड क्रमांक ५१३५ ५१८० ८९९३.

---0000---

मी वरील प्रमाणे असून वर नमूद ठिकाणी माझे कुंटूबासह रहावयास आहे. मी दिनांक. ०७/०७/२०२३ रोजीपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक (ए.ट.प.) या पदावर नेमणूकीस आहे.

मी दिनांक. १२/११/२०२५ रोजी कर्तव्यावर असताना मला माझे वरिष्ठांनी समक्ष बोलावून माहीती दिली की, एक तक्रारदार असून त्यांचेकडे लोकसेवक लाचेची मागणी करीत असलेबाबतची तक्रार त्यांनी दिनांक ३०/१०/२०२५ रोजी दिली होती. सदर तकारीची पडताळणी करण्याकरीता पोलीस निरीक्षक सुषमा खोत यांची तपासी अधिकारी व पोलीस निरीक्षक संतोष गुर्जर यांची पर्यवेक्षक अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात आली होती. तकारदार यांनी दिलेल्या तकारीवरुन दिनांक ३१/१०/२०२५ व दिनांक ०३/११/२०२५ रोजी लोकसेवक लाचेची मागणी करीत आहे किंवा नाही? याची पडताळणी करण्यात आली असता, दिनांक ०३/११/२०२५ रोजीचे पडताळणीत लोकसेवक यांनी तकादार यांच्याकडे त्यांच्या कामाच्या मोबादल्यात लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. आज दिनांक १२/११/२०२५ रोजी पर्यवेक्षक अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष गुर्जर हे काही कारणास्तव कार्यालयात उपस्थित नसल्याने त्यांचेऐवजी पर्यवेक्षक अधिकारी म्हणून आम्हास कर्तव्य करण्यास सांगितले.

त्यानुसार मी पो.नि. सुषमा खोत यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेवून त्यांचेकडे तक्रारीबाबत माहिती घेतली असता त्यांनी सांगितले की, ते दिनांक ३०/१०/२०२५ रोजी कार्यालयात हजर असतांना मा. वरिष्ठांनी बोलवून तकारदार श्री. परशुराम दशरथ गुंजाळ यांचा परिचय करुन देवून त्यांना लोकसेवकाकडून लाचेची मागणी होत असल्याने त्याबाबत त्यांचा तकार अर्ज घेवून पुढील कारवाई करावयाची असल्याचे सांगून सदर कारवाईमध्ये तपासी अधिकारी म्हणून त्यांची व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक संतोष गुर्जर यांची नेमणुक केल्याचे सांगून पोलीस निरीक्षक गुर्जर यांना समक्ष बोलवून तकारदाराच्या तकारीप्रमाणे पुढील कारवाई करण्याचे आदेशित केले. त्यानंतर त्यांनी व पो.नि. संतोष गुर्जर यांनी तक्रारदार यांच्याकडे सविस्तर चौकशी केली असता, तकारदार श्री.गुंजाळ यांनी त्यांच्या स्वःहस्तालिखित तकार अर्ज मराठीत लिहून दिला असल्याचे सांगून तकारदार गुंजाळ यांचा हस्तलिखित अर्ज आम्हास वाचण्यास दिला. तो पुढीलप्रमाणे ''तक्रारदार श्री. परशुराम दशरथ गुंजाळ वय ५६ वर्षे राठी:- बी १०२, बिल्डींग नंबर ३१/३३, कन्नमवार नगर नंबर-०१, विक्रोळी (पुर्व), मुंबई-४०० ०१३. हे दिनांक ०१/०५/२०२५ रोजी बेस्ट विभागतून सेवानिवृत्त झाले असून त्यांची पत्नी सौ. रेणूका गुंजाळ यांचे नावे असलेली मे. श्री. रेणूका इन्टरप्राईझेस (अनुज्ञाप्ती क्रमांक ३८७९९) या कंपनीमध्ये प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून सध्या काम पाहत आहे. श्री. रेणूका इन्टरप्राईझेस या कपंनीमार्फत विद्युत उद्‌वाहन स्थापित करणे, देखभाल करणे, इत्यादी कामे केली जातात. तक्रारदार श्री. गुंजाळ यांनी त्यांच्या कंपनीला उद्‌वाहन (उच्चदाब ४४० व्होल्ट) स्थापित करणे व देखभाल करणे याबाबत ठेकेदार परवाना मिळणेकरीता दिनांक १६/१०/२०२५ रोजी सांताक्रुझ निरिक्षण विभाग, ऊर्जा खाते, महाराष्ट्र शासन, एल.बी.एस. मार्ग, कुर्ला (पश्चिम) या कार्यालयात अर्ज सादर केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने सहाय्यक विद्युत निरिक्षक श्री. गजानन राठोड यांची भेट घेतली असता त्यांनी फाईलचा अभ्यास करुन तुम्हाला कळवितो असे त्यांना सांगितले.

दिनांक २७/१०/२०२५ रोजी सदर कार्यालयातुन श्री.राहूल शेवाळे यांनी तक्रारदार श्री. गुंजाळ यांना फोन करून ते श्री.राठोड सर यांचे असिस्टंट बोलत असल्याचे सांगून तक्रारदार यांना त्यांचे अर्जाच्या अनुषंगाने



Scanned with OKEN Scanner

कार्यालयात येवून भेटण्यास सांगितले असता, तक्रारदार श्री.गुंजाळ दोन दिवसात भेटण्यास येतील असे सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार गुंजाळ यांनी दिनांक २९/१०/२०२५ रोजी सदर कार्यालयात जावून श्री. राठोड यांची भेट घेतली असता श्री.राठोड यांनी तक्रारदार गुंजाळ यांच्याकडे १,८०,०००/- (अक्षरी एक लाख ऐंशी हजार रुपये फक्त) मागणी करून व टोकन म्हणून ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रुपये फक्त) आणून देण्यास सांगितले. तसेच कार्यालय प्रमुख श्री. मदाने यांना भेटण्यास सांगितले. त्यावरून तक्रारदार गुंजाळ हे विद्युत निरिक्षक श्री.निलेश मदाने यांना भेटले असता श्री.मदाने यांनी " तुम्ही राठोड यांची भेट घेतली का ?" विचारणा केल्यानंतर तक्रारदार गुंजाळ यांनी हो म्हटल्याने, श्री मदाने यांनी "तर ठिक आहे आपण तुमचे काम करू" असे बोलले. तक्रारदार श्री.गुंजाळ यांचेकडे श्री.राठोड यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ३०/१०/२०२५ रोजी ला.प्र.वि, मुंबई या कार्यालयात येवून समक्ष लेखी तक्रार अर्ज केला. सदरवेळी अर्जातील नमूद लोकसेवकांच्या कार्यालयातील कार्यालयीन कामकाजाची वेळ संपत असल्याचे तक्रारदार यांनी सांगितल्याने दिनांक ३१/१०/२०२५ रोजी शासकिय पंचांना पाचारण करून पुढील कारवाई करण्याचे तकारदार, व पडताळणी पोलीस पथक यांचे सर्वानुमते ठरले.

दिनांक ३१/१०/२०२५ रोजी पो.नि.सुषमा खोत यांनी सकाळी १२:१५ वा. सुमारास पो.ह कावले यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) सौ.पुजा काकासाहेब भोसले, वय ३० वर्षे, धंदा-नोकरी पद-सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, कार्यालयाचा पत्ता : प्रादेशिक परिवहन विभाग, बोरीवली विभाग, दहिसर (प) मुंबई ४०० ०६८ २) श्री. शरद विद्यासागर नखाते, वय ३८ वर्षे, धंदा-नोकरी पद-कनिष्ठ लिपीक, कार्यालयाचा पत्ता : प्रादेशिक परिवहन विभाग, अंधेरी विभाग, अंधेरी (प) मुंबई-४०० ०५३, रा ठी : फ्लॅट नंबर २०२, एस.के.ठाकूर अपार्टमेंट, सेक्टर नंबर ११, उलवे, नवी मुंबई ४१० २०६. यांना पाचारण केले. पंच कार्यालयात हजर येताच त्यांना तकारदार गुंजाळ यांची ओळख करून देवून त्यांचे तकारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून तकारदार यांनी दिनांक ३०/१०/२०२५ रोजी स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज पंचास वाचवयास देवून त्यावर समक्ष म्हणून पो.नि.खोत यांनी व पर्यवेक्षण अधिकारी पो.नि गुर्जर तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली व पो.नि.खोत यांनी सदरचा अर्ज त्यांचे ताब्यत घेवून पो.नि.खोत व पर्यवेक्षक अधिकारी पो.नि. गुर्जर यांनी दोन्ही पंच, तकारदार यांना पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व कारवयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पंच, तकारदार व पोलीस पथक असे लाप्रवि., मुंबई कार्यालयातून पडताळणीकरीता शासकीय वाहनाने रवाना होवून लोकसेवक यांचे एल.बी.एस.मार्ग, कुर्ला येथील विद्युत निरिक्षक यांचे कार्यालय या कार्यालयापासून काही अंतरावर थांबून पून्हा तकारदार व पंच क. १ यांना पथकातील तांत्रिक विभागाचे अमंलदार पो.शि. मिंडे यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर ची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना देवून तकारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून पो.नि.खोत यांनी तकारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बनियनला कोणासही दिसणार नाही अशा पध्दतीने लावला. त्यानंतर तकारदार गुंजाळ व पंच क.१ हे दिलेल्या सुचनेप्रमाणे लोकसेवक यांच्या कार्यालयास जावून परत पथक थांबलेल्या ठिकाणी आल्यानंतर पो.नि.खोत यांनी पो.शि.मिंडे यांच्या मदतीने व्हाईस रेकॉर्डर बंद केले. पो.नि.खोत यांनी तक्रारदार गुंजाळ व पंच यांना सदर कार्यालयात श्री.राठोड यांची प्रत्यक्ष भेट झाली किंवा कसे अशी विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, " श्री. राठोड हे बाहेर साईटवर व्हिजीट देण्याकरीता गेले असून ते कार्यालयात परत येणार नाहीत असे कार्यालयात हजर असलेले शिपाई यांच्याकडून समजल्याने ते वाहनाजवळ परत आले असल्याचे सांगितले. दिनांक ०१/११/२०२५ व दिनांक ०२/११/२०२५ रोजी लोकसेवक यांचे कार्यालय बंद असल्याकारणाने दिनांक ०३/११/२०२५ रोजी पुढील पडताळणी कारवाई करण्यात येणार असे तक्रारदार, पंच पोलिस पथक यांचे सर्वानुमते ठरले.

दिनांक ०३/११/२०२५ रोजी ठरल्याप्रमाणे तक्रारदार गुंजाळ, पंच १) सौ.पुजा काकासाहेब भोसले, वय ३० वर्षे, धंदा-नोकरी पद-सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, कार्यालयाचा पत्ता : प्रादेशिक परिवहन विभाग, बोरीवली विभाग, दहिसर (प) मुंबई ४०० ०६८ पंच २) श्री. विलास रामदास काकडे, वय ४५ वर्षे, धंदा-नोकरी पद-समार्जक, कार्यालयाचा पत्ता : बृहन्मुंबई महानगर पालिका, बी/वॉर्ड, दुसरा मजला,



Scanned with OKEN Scanner

बाबुलाल टँक रोड, सर जे.जे.रूग्णालय समोर, सॅन्डहर्स्ट रोड, मुंबई-४०० ००९, रा ठी : श्री. सिध्दी अर्पाटमेंट, चौथा मजला रूम नंबर ४०८, घेरार रोड, कल्याण-बदलापूर मार्ग, कोळेगाव, डोंबीवली (पुर्व) जिल्हा-ठाणे .( दिनांक ३१/१०/२०२५ रोजीचे पंच श्री. नखाते यांचे नातेवाईक मयत झाले असल्याने त्यांच्याऐवजी.) हे लाप्रवि कार्यालयात हजर झाल्यानंतर पंच क्रमांक ०२ यांना तक्रारदार यांच्या तक्रारी विषयी सविस्तर माहिती देवून तक्रारदार गुंजाळ, पंच व पडताळणी पथक असे शासकिय वाहनाने लाप्रवि कार्यालयातून निघून श्री.राठोड यांचे कार्यालय असलेल्या ठिकाणापासून काही अंतरावर थांबून तक्रारदार आणि पंच क्रमांक ०१ यांना पडताळणी कारवाई बाबत योग्य त्या सुचना दिल्या. व पो.नि.खोत यांनी पो.शि/भिंडे यांच्या मदतीने डिजीटील व्हॉईस रेकॉर्ड चालु करून तक्रारदार गुंजाळ यांच्या शर्टच्या आतील बनियनला कोणाला दिसणार नाही अशा रितीने लावला. व तक्रारदार व पंच क्रमांक ०१ हे श्री.राठोड यांच्या कार्यालयाच्या दिशेने रिक्षाने रवाना झाले. त्यानंतर तकारदार गुंजाळ व पंच क.१ हे दिलेल्या सुचनाप्रमाणे लोकसेवक यांच्या कार्यालयास जावून परत पथक थांबलेल्या ठिकाणी आल्यानंतर पो.नि.खोत यांनी पो.शि.भिंडे यांच्या मदतीने व्हाईस रेकॉर्डर बंद केले. तक्रारदार गुंजाळ व पंच क्रमांक ०१ यांनी लोकसेवक यांची त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेट झाली असल्याचे सांगितल्याने पो.नि.खोत व पो.नि.गुर्जर यांनी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डमधील संभाषण ऐकले असता. त्यामध्ये लोकसेवक राठोड यांनी प्रथमतः औपचारीक बोलणे झालेनंतर '' रेणूका आहे ना तुमच'' असे विचारले असता तक्रारदार गुंजाळ यांनी ''श्री.रेणूका इन्टरप्राईझेस '' असे सांगितले. त्यानंतर झालेल्या संभाषणमध्ये लोकसेवक राठोड यांनी ''किती आहेत'' असे विचारणा केली असता तक्रारदार गुंजाळ यांनी लोकसेवक राठोड यांना चाळीस हजार आहेत.... दहा कमी पडलेत..... पन्नास बोललो होतो ना.'' असे सांगितले असता लोकसेवक राठोड यांनी ''किती करणार आहेत तुम्ही'' असे विचारणा करता तक्रारदार गुंजाळ यांनी '' मी एक लाख ऐंशी हजार ना'' असे उत्तर दिले असता लोकसेवक राठोड यांनी ''करून घ्या, करून घ्या'' असे म्हणून पुन्हा '' मला बोलू द्या साहेबांना, मग मी तुम्हाला मेसेज देतो, माझ्याकडे एक नंबर आहे तुमचा'' असे बोलले. पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार गुंजाळ व लोकसेवक राठोड यांच्यामध्ये झालेल्या वर नमूद संभाषणावरून लोकसेवक राठोड यांनी तक्रारदार गुंजाळ यांच्या पत्नीचे नावे असलेल्या ''श्री.रेणूका इन्टरप्राईझेस '' या कंपनीला लायसन्स देण्याकरीता त्यांच्याकडे १,८०,०००/- (अक्षरी एक लाख ऐंशी हजार रूपये फक्त) लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न होत असल्याने लोकसेवक राठोड यांनी तक्रारदार गुंजाळ यांना संपर्क केल्यानंतरच पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानमुते ठरले.

दिनांक ०३/११/२०२५ रोजी ठरल्याप्रमाणे लोकसेवक राठोड यांनी तक्रारदार गुंजाळ यांना संपर्क केला अगर कसे याबाबत पो.नि.खोत यांनी वेळोवेळी तक्रारदार गुंजाळ यांना फोनद्वारे संपर्क करून विचारणा केली असता तक्रारदार गुंजाळ यांनी श्री.राठोड यांनी कोणत्याही प्रकारे संपर्क केला नसल्याचे सांगितले. दिनांक १२/११/२०२५ रोजी पो.नि.खोत यांनी तक्रारदार गुंजाळ व पंच यांना लाप्रवि कार्यालयात बोलावुन घेतले.

दिनांक ०३/११/२०२५ रोजी पडताळणीवेळी पर्यवेक्षक अधिकारी म्हणून काम पाहिलेले पो.नि.संतोष गुर्जर हे कार्यालयात उपलब्ध नसल्याने मा. वरिष्ठांनी पर्यवेक्षण अधिकारी म्हणून काम पाहण्यास आम्हास आदेशित केले आहे. दिनांक ०४/११/२०२५ पासून आज पावेतो लोकसेवक राठोड यांनी तक्रारदार गुंजाळ यांच्याशी कोणताही संपर्क केला नाही तसेच तक्रारदार गुंजाळ यांनी वेळोवेळी केलेल्या कॉल ला उत्तर दिले नसल्याने परत पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. त्याप्रमाणे तक्रारदार गुंजाळ, पंच व पडताळणी पथक असे शासकिय वाहनाने लाप्रवि कार्यालयातून पडताळणी व सापळा कारवाई करीता लागणारे सर्व साहित्यासह निघून श्री.राठोड यांचे कार्यालय असलेल्या ठिकाणापासून काही अंतरावर थांबून तक्रारदार आणि पंच क्रमांक ०२ श्री. काकडे यांना पडताळणी कारवाई बाबत योग्य त्या सुचना दिल्या. व पो.नि.खोत यांनी पो.शि/भिंडे यांच्या मदतीने डिजीटील व्हॉईस रेकॉर्ड चालु करून तक्रारदार गुंजाळ यांच्या शर्टच्या आतील बनियनाल कोणाला दिसणार नाही अशा रितीने लावला. व तक्रारदार व पंच क्रमांक ०२ श्री. काकडे हे श्री.राठोड यांच्या कार्यालयाच्या दिशेने रिक्षाने रवाना झाले. त्यानंतर तक्रारदार गुंजाळ व पंच क.०२ श्री.काकडे हे दिलेल्या सुचनाप्रमाणे लोकसेवक यांच्या कार्यालयास जावून परत पथक थांबलेल्या ठिकाणी आल्यानंतर पो.नि.खोत यांनी पो.शि.भिंडे यांच्या मदतीने



Scanned with OKEN Scanner

व्हाईस रेकॉर्डर बंद केले. तक्रारदार गुंजाळ व पंच क्रमांक ०२ श्री.काकडे यांनी लोकसेवक यांची त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेट झाली असल्याचे सांगितल्याने पो.नि.खोत व आम्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डमधील संभाषण ऐकले असता. झालेल्या संभाषणामध्ये तक्रारदार गुंजाळ हे ''मागच्या वेळेस आपले झाले ना ते फायनल असे बोलले असता'' लोकसेवक राठोड यांनी ''खर्च खुप जास्त आहे''. असे म्हटल्यावर तक्रारदार यांनी ''करू ना साहेब'' असे म्हटल्यावर लोकसेवक राठोड यांनी ''तुम्हाला वाटेल ते तुम्ही डिसाईड करा रेग्युलर पेक्षा डबल खर्च चालु आहे.'' '' तुम्हाला एक ऐंशी बोललो होतो ना.'' ''त्याच्या डबल चार्जेस लागेल''. असे बोलल्याने तक्रारदार गुंजाळ यांनी ''सर मला लगेच नाही अरेंज होणार'' ''त्यातले किती देवू तुम्हाला'' असे विचारता लोकसेवक राठोड यांनी '' **मीनिमम (एक बोट दाखवुन ) पर्यंत द्या तुम्ही असे म्हणून १,००,०००/- (अक्षरी एक लाख रुपये) मागणी केली''.** तसेच पुढील वर्षमध्ये तक्रारदार हे चालेल उद्या येतो मी, डायरेक्ट येतो .... फोन नाही आता करत मग असे बोलले असता लोकसेवक राठोड यांनी. '' दुपारून या .'' असे सांगितले.

दिनांक १२/११/२०२५ रोजी झालेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक राठोड यांनी तक्रारदार गुंजाळ यांना आज दिनांक १३/११/ २०२५ रोजी लाचेची रक्कम रू. १,००,०००/- (अक्षरी एक लाख रुपये फक्त ) घेवून येण्यास सांगितले असल्याने पो.नि.खोत यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे तक्रारदार गुंजाळ व पंच लाप्रवि कार्यालयात हजर झाले. त्यावेळी तक्रारदार गुंजाळ यांनी लोकसेवक राठोड यांना लाच म्हणून देणे कामी त्यांच्या बचतीमधून घरी असलेली २०,०००/- (अक्षरी वीस हजार रुपये फक्त) रक्कम आणली असल्याचे सांगून ५०० रुपये दराच्या ४० भारतीय चलनी नोटा पंचांच्या उपस्थितीत पो.नि.खोत यांच्यासमक्ष हजर केल्या. त्यानंतर पो.नि.खोत यांनी पथकातील अमंलदार पोह.सुर्यवंशी यांचेमार्फतीने लाचेच्या रक्कमेच्या झेरॉक्स काढण्यात आल्या. लोकसेवक राठोड यांनी लाच रक्कमेची मागणी केल्या प्रमाणे एक लाख रुपये लाचेची रक्कम देणे असल्याने पो.नि.खोत यांनी ८०,०००/- (ऐंशी हजार रुपये फक्त) ५०० रुपये दराच्या १६० खेळाण्यातील नोटा तक्रारदार गुंजाळ यांनी आणलेल्या २०,०००/- रूपयाच्या नोटाबरोबर मिळवून सदरची रक्कम ही लाच रक्कम म्हणून लोकसेवक राठोड यांना देण्यात येणार असल्याचे सांगितले. पो.ह. कावले यांनी पंच व तकारदार यांना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले व लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रक्कमेस अॅन्थ्रासिन पावडर लावून ती रक्कम सफेद रंगाच्या पाकिटामध्ये ठेवून सदर सफेद रंगाच्या पाकिटाला अॅन्थ्रासिन पावडर लावून ते पाकिट तकारदार यांच्या फुल पॅन्टच्या खिशात ठेवले. त्यानंतर पो.ह. कावले हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले. आज रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरले असल्याने तक्रारदार गुंजाळ, पंच व सापळा पथक असे शासकिय वाहनाने लाप्रवि कार्यालयातून सापळा कारवाई करीता लागणारे सर्व साहित्यासह निघून श्री.राठोड यांचे कार्यालय असलेल्या ठिकाणापासून एल.बी.एस. रोडवरील फिनिक्स मॉलच्या पुढे महानगर गॅस पंपाच्या शेजारी वाहने थांबविली. तेथून तक्रारदार व पंच क्र. २ यांना सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या सुचना दिल्या. व लोकसेवक यांनी लाच स्विकारताच तक्रारदार गुंजाळ हे त्यांच्या उजव्या हाताने लाच स्विकारल्या बाबतचा पुर्वनियोजित थंबचा इशारा करतील अशा सुचना देवून पो.नि.खोत यांनी पो.शि/मिंडे यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार गुंजाळ यांच्या शर्टच्या आतील बनियनला कोणाला दिसणार नाही अशा रितीने चालु करून लावुन तक्रारदार गुंजाळ व पंच क्र. ०२ काकडे असे दोघे लोकसेवक राठोड यांच्या कार्यालयाच्या दिशेने गेले. त्याप्रमाणे सापळा कारवाईतील इतर अंमलदार व अधिकारी हे त्यांच्या मागोमाग जावून लोकसेवक राठोड यांच्या कार्यालयाच्या परिसरात कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबून राहिले. त्यानंतर तक्रारदार गुंजाळ लोकसेवक राठोड यांच्या कार्यालयात गेल्यावर तक्रदार गुंजाळ यांनी लोकसेवक राठोड कार्यालयात आहेत किंवा नाही याबाबत माहिती घेतली असता लोकसेवक राठोड कार्यालयात उपस्थित नसल्याबाबत त्यांना समजले. त्यानंतर तक्रारदार गुंजाळ व पंच क्रमांक ०२ काकडे लोकसेवक राठोड यांच्या कार्यालयातून निघून शासकिय वाहन उभे असल्या ठिकाणी परत आले. व त्याप्रमाणे सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार सदर ठिकाणी परत आले. त्यानंतर तक्रारदार गुंजाळ यांचे मोबाईल वरून लोकसेवक राठोड यांच्या मोबाईलवर पंचासमक्ष फोन केला असता लोकसेवक राठोड यांनी फोन



Scanned with OKEN Scanner

स्विकारून ते १५ मिनिटात कार्यालयात पोहचत आहे असे सांगितल्याने तक्रारदार गुंजाळ व पंच क्रमांक ०२ यांना लोकसेवक राठोड यांच्या कार्यालयात पुन्हा त्यांच्या भेटी करीता रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार लोकसेवक राठोड यांच्या कार्यालयाच्या परिसरात कोणतही संशय येणार नाही अशा रितीने थांबून राहिले.तक्रारदार गुंजाळ सदर कार्यालयात गेल्यानंतर सदर कार्यालयात इतर माणसांची वरदळ जास्त असल्याने ते सदर कार्यालयाती लोकसेवक राठोड यांच्या कॅबिनच्या बाहेर उभे राहिले. थोडयावेळानंतर लोकसेवक राठोड यांनी तक्रारदार यांना त्यांच्या कॅबिन मध्ये बोलावले व पंच ०२ काकडे यांना कॅबिनच्या बाहेर उभे केले. सदर कॅबिन मध्ये लोकसेवक राठोड व तक्रारदार यांच्या संभाषणामध्ये तक्रारदार गुंजाळ यांनी लोकसेवक राठोड यांना '' कालचा विषय आपुन, बोलु बोलु थोड''असे बोलले असता लोकसेवक राठोड यांनी तक्रारदार गुंजाळ यांना '' मग तुम्हाला जायचं चला देवून टाका'' असे बोलुन त्यांच्याकडे लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार श्री.गुंजाळ यांनी त्यांच्या पॅन्टच्या खिशातील लाचेची रक्कम ठेवलेली सफेद रंगाचे पाकीट बाहेर काढून लोकसेवक राठोड यांचे समोर धरले असता लोकसेवक राठोड यांनी तक्रारदार गुंजाळ यांना ''एक लाख नसतील, पन्नास असतील '' असे बोलले असता, तक्रारदार गुंजाळ म्हणाले की, '' आहेत ते एक लाख घे'' तक्रारदार गुजांळ यांच्याकडून लोकसेवक राठोड यांच्याकडून लाचेची रक्कम ठेवलेली सफेद रंगाचे पाकीट स्विकारून लोकसेवक राठोड यांच्या खुर्चीच्या डाव्या बाजूस पायाजवळ असलेल्या काळया रंगाच्या बॅगेमध्ये ठेवले. त्यानंतर तक्रारदार गुंजाळ यांनी लोकसेवक राठोड यांनी लाच स्विकारले बाबतचा पुर्वनियोजित थंब इशारा केल्याने पो.नि.खोत, आम्ही व सापळा पथकाने लागलीच पंच क. २ यांचे सहाय्याने लोकसेवक श्री. गजानन प्रल्हाद राठोड यांना १७:४३ वा. त्यांचे कार्यालयातील कॅबीनमध्ये त्यांना ताब्यात घेतले. त्यांना त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री. गजानन प्रल्हाद राठोड, वय ४० वर्षे, धंदा नोकरी पद - सहाय्यक अभियंता (विद्युत) (नेमणुक : विद्युत निरिक्षक यांचे कार्यालय, एल.बी.एस.मार्ग, कुर्ला (पश्चिम) मुंबई-७० ), राठी : बिल्डिंग नंबर १०, ए विंग, रुम नंबर ४०८, निसर्ग को.ऑप.हौ.सोसायटी, चांदीवली म्हाडा कॉलनी, अंधेरी (पुर्व) मुंबई-७२, मुळ पत्ता- साई आशिर्वाद बिल्डींग,प्लॉट नं.१८, गट नं. १३८, छत्रपती नगर, छत्रपती संभाजी नगर असे सांगितले आहे.

तरी लोकसेवक श्री. गजानन प्रल्हाद राठोड यांनी तक्रारदार श्री. परशुराम दशरथ गुंजाळ यांच्या पत्नी श्रीमती रेणूका गुंजाळ यांचे नावा वरील श्री.रेणूका इन्टरप्राईझेस या कंपनीस लिफ्ट कॉन्ट्रक्टर लायसन्स देण्याकरीता तकारदार श्री.गुंजाळ यांच्याकडे पडताळणी कारवाई दरम्यान दिनांक ०३/११/२०२५ रोजी एक लाख ऐंशी हजार व दिनांक १२/११/२०२५ रोजी चार लाख रूपये लाचेची मागणी करून स्वत:स गैरफायदा प्राप्त करण्याच्या हेतूने दिनांक १३/११/२०२५ रोजी तक्रारदार गुंजाळ यांच्याकडून टोकन म्हणून एक लाख रूपये लाच स्विकारण्याची तयारी दर्शविली व त्याप्रमाणे आज दिनांक १३/११/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष एक लाख रूपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले म्हणून लोकसेवक गजानन प्रल्हाद राठोड यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारीत २०१८) चे कलम ७ अन्वये सरकारतर्फे माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी फिर्याद मी स्वत: संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष,

सुषमा एस. खोत
पोलीस निरीक्षक
लाप्रवि, मुंबई

हा लिहून दिला,

(गणपत परचाके)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई



Scanned with OKEN Scanner